सातारा दि.१६/०३/२०२३

## प्रसिध्दीपत्रक

## सातारा पोलीस भरती - २०२१

सातारा जिल्हा पोलीस भरती २०२१ मधील पोलीस शिपाई पदाकरिता ऑनलाईन आवेदन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची शारीरिक व मैदानी चाचणी दि.०४/०१/२०२३ ते दि.०८/०१/२०२३ रोजी पर्यंत घेण्यात आलेली होती. त्याअनुषंगाने उमेदवारांकडून प्राप्त झालेल्या तक्रारी / हरकतीची पडताळणी करण्यात आली असून त्याबाबत योग्य ती कार्यवाही करुन शारीरिक व मैदानी चाचणीची अंतिम गुणवत्ता यादी दि.२०/०१/२०२३ रोजी सातारा जिल्हा पोलीस दलाचे अधिकृत माध्यमांद्वारे प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

शासनाने तृतीयपंथी उमेदवारांबाबत महाराष्ट्र शासन गृह विभाग अधिसुचना क्र.पोलीस-११२२/प्र.क्र.२८५/पोल-५ अ, दि.१४/०३/२०२३ अन्वये निश्चित केलेल्या निकषानुसार दि.१६/०३/२०२३ रोजी तृतीयपंथी उमेदवारांची शारीरिक व मैदानी चाचणी घेण्यात आलेली आहे.

**त्यानुसार शारीरिक चाचणी व मैदानी चाचणीमध्ये कमीत कमी ५० टक्के गुण प्राप्त केलेल्या उमेदवारांमधून प्रवर्गनिहाय जाहिरातमध्ये दिलेल्या रिक्त पदांच्या १:१० या प्रमाणानुसार लेखी परीक्षेसाठी पात्र असलेल्या उमेदवारांची तात्पुरती निवड यादी सातारा जिल्हा पोलीस दलाचे अधिकृत प्रसिध्दी माध्यम फेसबुक, ट्विटर तसेच www.satarapolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.**

प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीमध्ये प्रवर्गनिहाय रिक्त पदांच्या १:१० या प्रमाणानुसार उमेदवारांच्या काही तक्रारी / हरकती असल्यास दि.२०/०३/२०२३ रोजी १८.०० वाजेपर्यंत [सायबर पोलीस ठाणे ०२१६२-२३४१३० Extn - २३८] या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा अथवा sp.satara@mahapolice.gov.in या ई-मेलवर पाठविण्यात याव्यात. **दिलेल्या कालावधीनंतर आलेल्या तक्रारी / हरकतीचा विचार केला जाणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

SUPDT. OF POLICE SATARA

पोलीस अधीक्षक, सातारा.